# पुणे जिल्हा शिक्षण मंडळ
## मामासाहेब मोहोळ महाविद्यालय,पौड रोड,पुणे-३८
## स्पर्धा परीक्षा विभाग अहवाल
## शैक्षणिक वर्ष:-2022-23

गुरुवार दिनांक 9 मार्च 2023 रोजी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या मामासाहेब मोहोळ महाविद्यालयात वूमन सेल आणि स्पर्धा परीक्षा विभागामार्फत आयोजित केलेल्या कार्यक्रमात ए यु स्मॉल फायनान्स बँकेचे कोथरूड शाखेचे व्यवस्थापक श्री गोपाल कोकाटे, क्लस्टर हेड श्री यतीश शहा तसेच रीजनल मार्केटिंग मॅनेजर श्री मनीष मालवीय उपस्थित होते.

श्री यतिश शहा यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील बँकिंग क्षेत्रातील संधी या विषयावर उत्तम मार्गदर्शन केले त्याचबरोबर ए यु स्मॉल फायनान्स बँकेमध्ये महाविद्यालयाचा स्टाफ आणि विद्यार्थ्यांना बँकिंग सेवे संदर्भात आवश्यक असणारी सर्व मदत केली जाईल याची हमी दिली

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ए यु स्मॉल फायनान्स बँकेमार्फत महाविद्यालयातील एकूण 18 महिला शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा भेट वस्तू देऊन गौरविण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी पी सातव यांनी आपल्या मनोगतामध्ये भविष्यात ए यु स्मॉल फायनान्स बँके बरोबर विविध उपक्रम राबविता येईल जेणेकरून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना बँकिंग क्षेत्राविषयी विशेष प्रशिक्षण आणि माहिती मिळू शकेल अशी आशा व्यक्त केली.

या संपूर्ण कार्यक्रमाचे संयोजन अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ मेघना भोसले यांनी केले. या कार्यक्रमासाठी उपप्राचार्य डॉ शिवाजी शिंदे, डॉ योगेश पवार, डॉ प्रकाश हुंबड, डॉ श्रीनिवास इपलपल्ली, डॉ.भरत राठोड कार्यालयीन व्यवस्थापक श्री गणेश साबळे आवर्जून उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रूपाली शेंडकर यांनी केले आणि आभार वाणिज्य विभाग प्रमुख डॉ सुनीता डाकले यांनी मानले

ए यु स्मॉल फायनान्स बँकेचे श्री गोपाल कोकाटे, क्लस्टर हेड श्री यतीश शहा तसेच रीजनल मार्केटिंग मॅनेजर श्री मनीष मालवीय यांचे स्वागत करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सातव जी. पी. व इतर




श्री यतिश शहा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना




विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. सातव जी. पी.



डॉ. रूपाली शेंडकर

प्राचार्य डॉ. महेंद्र अवघडे

(**स्पर्धा परीक्षा विभाग** समन्वयक)